**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३१४, ३१५, ३१६, ३१७ आणि ३१८/२०२६**
**मधील निशाणी क्र.१ वरील एकत्रीत आदेश.**
(**CNR NO**.**MHBI**030014872026)
(**CNR NO**.**MHBI**030014882026)
(**CNR NO**.**MHBI**030014902026)
(**CNR NO**.**MHBI**030014912026)
(**CNR NO**.**MHBI**030014922026)

पिंपळनेर पोलीस ठाणे गु.र.नं. ११३/२०२६ मधील जप्त करण्यात आलेला मुद्देमाल म्हणजेच बैल/गोवंश व वाहने परत मिळण्यासाठी लक्ष्मण दुबाले, निखील लांडगे, गणेश लांडगे, ईश्वर आमटे व बलभीम खुर्णे यांनी वेगवेगळे उपरोक्त नमुद पाच स्वतंत्र अर्ज भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ५०३ प्रमाणे दाखल केलेले आहेत. सदर अर्जावरती तपासी अधिकारी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता व त्रयस्थ इसम म्हणजेच गोशाळा यांच्या वतीने त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले आहे. सदरचे पाच वेगवेगळे अर्ज दाखल केलेले असून त्यामध्ये एकत्रीतरित्या युक्तीवाद करण्यात आलेला आहे. सदरचे वेगवेगळया अर्जातील गुंतागुंत वाढू नये म्हणून व सदरचे वेगवेगळे अर्ज एकाच गुन्हयातील मुद्देमाल परतीसाठी केलेले असल्यामुळे सदरचे अर्ज मी एकत्रीतरित्या विवेचित करुन त्यावर मी माझे एकत्रीत निष्कर्ष नोंदवित आहे.

२.  अर्जदार यांनी दाखल केलेले अर्ज, तपासी अधिकारी, सहा. सरकारी अभियोक्ता व त्रयस्थ इसम/गोशाळा यांनी दाखल केलेले म्हणणे व दस्ताऐवज यांचे अवलोकन केले. अर्जदारांचे वकील, सहा. सरकारी अभियोक्ता व त्रयस्थ इसम/ गोशाळा यांचे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. माझ्या समोर खालील मुद्दे उपस्थित झाले. सदर मुद्दयावरील मी माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
| --- | --- | --- |
| १. | अर्जदार हे त्यांनी मागणी केलेले एकुण ८ बैल/गोवंश (“जप्त पशुधन”) परत मिळण्यासाठी पात्र आहेत काय ? | **...नाही.** |
| २. | अर्जदार हे त्यांनी मागणी केलेली जप्त वाहन क्रमांक एम.एच.–०५–बी.एच.–८९८५ व एम.एच.–२३–ए.यु.–८१४१ ही वाहने परत मिळण्यासाठी पात्र आहेत काय ? | **...होय.** |
| ३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>कारणमिमांसा</u>

**मुद्दा क्र. १ व २ बाबत –**

३.  उपरोक्त दोन्ही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे मी सदरचे दोन्ही मुद्दे एकत्रीत विवेचीत करीत आहे व त्यावरील मी माझे निष्कर्ष नोंदवित आहे.

MANIKRAO SATAV Digitally signed by MANIKRAO SATAV Date: 2026.06.17 16:57:44 +0530

४. अर्जदार लक्ष्मण दुबाले यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३१४/२०२६ हा दाखल करुन पिंपळनेर पोलीस ठाणे गु.र.नं.११३/२०२६ मधील जप्त करण्यात आलेले वाहन नोंदणी क्र.एम.एच.–०५–बी.एच.–८९८५ हे परत मिळण्यासाठी विनंती केलेली आहे. त्यामध्ये त्यांनी सदरचे जप्त वाहन पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास त्याचे नुकसान होण्याची शक्यता आहे. सदर वाहनाची त्यांना दैनंदिन कामासाठी व व्यवसायाकरिता आवश्यकता आहे. तसेच सदरचे वाहन त्यांच्या ताब्यात दिल्यास ते त्यामध्ये कोणताही बदल करणार नाहीत व न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यास तयार आहेत असे कथन करुन सदरचे वाहन परत देण्याबाबत त्यांनी विनंती केलेली आहे.

५. अर्जदार लक्ष्मण दुबाले यांनी सदर अर्जासोबत निशाणी क्र. ४ च्या यादीसोबत वादातीत गुन्हयाच्या प्रथम खबरी अहवालाची प्रत, वाहनाची नोंदणी प्रमाणपत्राची व्हेरिफाईड प्रत, त्यांच्या आधारकार्डची व्हेरिफाईड प्रत, वाहनाच्या विमा पावतीची झेरॉक्स प्रत इत्यादी कागदपत्रे सादर केलेली आहेत.

६. तपासी अधिकारी यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३१४/२०२६ मध्ये निशाणी क्र.५ वरती त्यांची लेखी म्हणणे सादर करुन सक्त हरकत नोंदविलेली आहे. तसेच सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी देखील त्यांचे लेखी म्हणणे सादर करुन त्यांची हरकत नोंदविलेली आहे. तर त्रयस्थ इसम/गोशाळा यांच्या वतीने निशाणी क्र. ११ वरती त्यांचे लेखी म्हणणे सादर करुन सक्त हरकत नोंदविलेली आहे व त्यामध्ये त्यांनी जप्त पशुधनाच्या पालनाच्या खर्चाची हमी घेऊन अर्जदार

यांचे वाहन अटी व शर्तीवरती परत करण्यास हरकत नाही असे कथन केलेले आहे.

७. अर्जदार निखील गणेश लांडगे यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३१५/२०२६ सादर करुन पिंपळनेर पोलीस ठाणे गु.र.नं.११३/२०२६ मधील जप्त करण्यात आलेले दोन बैल परत मिळण्याची विनंती केलेली आहे. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये सदरचे बैल त्यांनी दिनांक २२/०४/२०२६ रोजी अशोक बाजीराव शेळके यांच्याकडून खरेदी केलेले आहेत. वादातीत गुन्हयाचा तपास पुर्ण झालेला आहे. अर्जदार हे शेतीचा व्यवसाय करतात व त्यांना दैनंदिन कामासाठी सदर बैलांची आवश्यकता आहे. ते न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यास तयार आहेत. सदर बैल/गोवंश यांची ते विक्री करणार नाहीत व न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे बंदपत्र देण्यास तयार असून त्यांनी सदरचे बैल त्यांना परत मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. अर्जदार यांनी निशाणी क्र.४ च्या दाखल यादीसोबत वादातीत गुन्हयाच्या प्रथम खबरी अहवालाची प्रत, बैल/गोवंश खरेदी पावतीची प्रत व त्यांच्या आधारकार्डची प्रत सादर केलेली आहे.

८. तपासी अधिकारी यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३१५/२०२६ मध्ये निशाणी क्र. ५ वरती त्यांचे लेखी म्हणणे सादर करुन अर्जदार यांच्या अर्जास हरकत नोंदविलेली आहे. यामध्ये त्यांनी अर्जदार यांनी जनावरांची वाहतुक करण्यासाठी त्यांच्या आरोग्याची कोणतीही काळजी घेतली नाही, पशु वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून वैद्यकीय तपासणी केलेली नाही, जप्त करण्यात आलेले दोन बैल/गोवंश हे गोशाळेमध्ये सुरक्षीत ठेवण्यात आलेले आहेत. अर्जदार यांनी

MANIKRAO SATAV

Digitally signed by MANIKRAO SATAV
Date: 2026.06.17 16:57:52 +0530

बैल/गोवंशाची कोणतीही काळजी घेतलेली नाही त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

**९.** सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी देखील त्यांचे निशाणी क्र. १ वरती लेखी म्हणणे सादर करुन सदर अर्जास सक्त हरकत नोंदविलेली आहे. अर्जदार यांनी प्राण्यांचा छळ केलेला आहे, वादातीत गुन्हयाचा तपास चालू आहे इत्यादी कारणांमुळे अर्जदार यांचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**१०.** त्रयस्थ इसम/गोशाळा यांनी निशाणी क्र. ११ वरती त्यांचे लेखी म्हणणे सादर करुन जप्त करण्यात आलेले बैल/गोवंश अर्जदार यांना परत करु नयेत अशी सक्त हरकत नोंदविलेली आहे. तसेच अर्जदार यांच्याकडून बैल/गोवंश यांच्या पशुपालनाचा प्रतिदिन २००/– रुपये खर्च मिळावा अशी मागणी केलेली आहे.

**११.** अर्जदार गणेश लक्ष्मण लांडगे यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३१६/२०२६ सादर करुन पिंपळनेर पोलीस ठाणे गु.र.नं.११३/२०२६ मधील जप्त करण्यात आलेले दोन बैल/गोवंश परत मिळण्याची विनंती केलेली आहे. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये सदरचे बैल त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती पाथर्डी येथून दिनांक २२/०४/२०२६ रोजी अशोक बाजीराव शेळके यांच्याकडून खरेदी केलेले आहेत, वादातीत गुन्हयाचा तपास पुर्ण झालेला आहे. अर्जदार हे शेतीचा व्यवसाय करतात व त्यांना दैनंदिन कामासाठी सदर बैलांची आवश्यकता

आहे. ते न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यास तयार आहेत. सदर बैल/गोवंश यांची ते विक्री करणार नाहीत व न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे बंदपत्र देण्यास तयार असून त्यांनी सदरचे बैल त्यांना परत मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. अर्जदार यांनी निशाणी क्र.४ च्या दाखल यादीसोबत वादातीत गुन्हयाच्या प्रथम खबरी अहवालाची प्रत, बैल/गोवंश खरेदी पावतीची प्रत व त्यांच्या आधारकार्डची प्रत सादर केलेली आहे.

**१२.** तपासी अधिकारी यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३१६/२०२६ मध्ये निशाणी क्र. ५ वरती त्यांचे लेखी म्हणणे सादर करुन अर्जदार यांच्या अर्जास हरकत नोंदविलेली आहे. यामध्ये त्यांनी अर्जदार यांनी जनावरांची वाहतुक करण्यासाठी त्यांच्या आरोग्याची कोणतीही काळजी घेतली नाही, पशु वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून वैद्यकीय तपासणी केलेली नाही, जप्त करण्यात आलेले दोन बैल/गोवंश हे गोशाळेमध्ये सुरक्षीत ठेवण्यात आलेले आहेत. अर्जदार यांनी बैल/गोवंशाची कोणतीही काळजी घेतलेली नाही त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

**१३.** सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी देखील त्यांचे निशाणी क्र. १ वरती लेखी म्हणणे सादर करुन त्यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३१५/२०२६ मध्ये सादर केलेले म्हणणे प्रस्तुत अर्जास ग्राहय धरण्यात यावे असे कथन करुन सदर अर्जास सक्त हरकत नोंदविलेली आहे. अर्जदार यांनी प्राण्यांचा छळ केलेला आहे, वादातीत गुन्हयाचा तपास चालू आहे इत्यादी कारणांमुळे अर्जदार यांचा अर्ज

MANIKRAO SATAV

Digitally signed by MANIKRAO SATAV
Date: 2026.06.17 16:58:00 +0530

नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**१४.** त्रयस्थ इसम/गोशाळा यांनी निशाणी क्र. १४ वरती त्यांचे लेखी म्हणणे सादर करुन जप्त करण्यात आलेले बैल/गोवंश अर्जदार यांना परत करु नयेत अशी सक्त हरकत नोंदविलेली आहे. तसेच अर्जदार यांच्याकडून बैल/गोवंश यांच्या पशुपालनाचा प्रतिदिन २००/- रुपये खर्च मिळावा अशी मागणी केलेली आहे.

**१५.** अर्जदार ईश्वर अंकुशराव आमटे यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३१७/२०२६ सादर करुन पिंपळनेर पोलीस ठाणे गु.र.नं.११३/२०२६ मधील जप्त करण्यात आलेले दोन बैल/गोवंश परत मिळण्याची विनंती केलेली आहे. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये सदरचे बैल त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती पाथर्डी येथून दिनांक २२/०४/२०२६ रोजी उध्दव महादेव आव्हाड व अजिनाथ महादेव आव्हाड यांच्याकडून खरेदी केलेले आहेत, वादातीत गुन्हयाचा तपास पुर्ण झालेला आहे. अर्जदार हे शेतीचा व्यवसाय करतात व त्यांना दैनंदिन कामासाठी सदर बैलांची आवश्यकता आहे. ते न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यास तयार आहेत. सदर बैल/गोवंश यांची ते विक्री करणार नाहीत व न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे बंदपत्र देण्यास तयार असून त्यांनी सदरचे बैल त्यांना परत मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. अर्जदार यांनी निशाणी क्र.४ च्या दाखल यादीसोबत वादातीत गुन्हयाच्या प्रथम खबरी अहवालाची प्रत, बैल/गोवंश खरेदी पावतीची प्रत व त्यांच्या आधारकार्डची प्रत सादर केलेली आहे.

**१६.** तपासी अधिकारी यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३१७/२०२६ मध्ये निशाणी क्र. ५ वरती त्यांचे लेखी म्हणणे सादर करुन अर्जदार यांच्या अर्जास हरकत नोंदविलेली आहे. यामध्ये त्यांनी अर्जदार यांनी जनावरांची वाहतुक करण्यासाठी त्यांच्या आरोग्याची कोणतीही काळजी घेतली नाही, पशु वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून वैद्यकीय तपासणी केलेली नाही, जप्त करण्यात आलेले दोन बैल/गोवंश हे गोशाळेमध्ये सुरक्षीत ठेवण्यात आलेले आहेत. अर्जदार यांनी बैल/गोवंशाची कोणतीही काळजी घेतलेली नाही त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

**१७.** सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी देखील त्यांचे निशाणी क्र. १ वरती लेखी म्हणणे सादर करुन त्यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३१५/२०२६ मध्ये सादर केलेले म्हणणे प्रस्तुत अर्जास ग्राहय धरण्यात यावे असे कथन करुन सदर अर्जास सक्त हरकत नोंदविलेली आहे. अर्जदार यांनी प्राण्यांचा छळ केलेला आहे, वादातीत गुन्हयाचा तपास चालू आहे इत्यादी कारणांमुळे अर्जदार यांचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

**१८.** त्रयस्थ इसम/गोशाळा यांनी निशाणी क्र. ११ वरती त्यांचे लेखी म्हणणे सादर करुन जप्त करण्यात आलेले बैल/गोवंश अर्जदार यांना परत करु नयेत अशी सक्त हरकत नोंदविलेली आहे. तसेच अर्जदार यांच्याकडून बैल/गोवंश यांच्या पशुपालनाचा प्रतिदिन २००/– रुपये खर्च मिळावा अशी मागणी केलेली आहे.

MANIKRAO SATAV
Digitally signed by MANIKRAO SATAV
Date: 2026.06.17 16:58:07 +0530

**१९.** अर्जदार बलभीम तुकाराम खुर्णे यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३१८/२०२६ सादर करुन पिंपळनेर पोलीस ठाणे गु.र.नं.११३/२०२६ मधील जप्त करण्यात आलेले दोन बैल/गोवंश व चार चाकी वाहन नोंदणी क्र.एम.एच.–२३–ए.यु.–८१४१ ही परत मिळण्याची विनंती केलेली आहे. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये ते जप्त वाहनाचे मालक असल्याचे व सदरचे वाहन पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास त्याचे भाग खराब होण्याची शक्यता असल्याने व त्यांना सदर जप्त वाहनाची नियमित वापरासाठी आवश्यकता असल्याने सदरचे वाहन त्यांना परत करण्यात यावे अशी विनंती केलेली आहे. तसेच ते न्यायालयाच्या आदेशाचे व अटींचे पालन करण्यास तयार आहेत असेही त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये कथन केलेले आहे. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जामध्ये सदरचे बैल त्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती पाथर्डी येथून दिनांक २२/०४/२०२६ रोजी गणेश अरुण नरवडे यांच्याकडून खरेदी केलेले आहेत, वादातीत गुन्हयाचा तपास पुर्ण झालेला आहे. अर्जदार हे शेतीचा व्यवसाय करतात व त्यांना दैनंदिन कामासाठी सदर बैलांची आवश्यकता आहे. ते न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्यास तयार आहेत. सदर बैल/गोवंश यांची ते विक्री करणार नाहीत व न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे बंदपत्र देण्यास तयार असून त्यांनी सदरचे बैल त्यांना परत मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. अर्जदार यांनी निशाणी क्र.४ च्या दाखल यादीसोबत वादातीत गुन्हयाच्या प्रथम खबरी अहवालाची प्रत, बैल/गोवंश खरेदी पावतीची प्रत, वाहनाच्या विम्याची प्रत, वाहनाचे पर्टीक्युलर्स व त्यांच्या आधारकार्डची प्रत सादर केलेली आहे.

२०. तपासी अधिकारी यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३१८/२०२६ मध्ये निशाणी क्र. ५ वरती त्यांचे लेखी म्हणणे सादर करुन अर्जदार यांच्या अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यामध्ये त्यांनी अर्जदार यांनी जनावरांची वाहतुक करण्यासाठी जप्त करण्यात आलेल्या वाहनाचा उपयोग केलेला आहे. तसेच बैल/गोवंश यां आरोग्याची अर्जदार यांनी कोणतीही काळजी घेतली नाही, पशु वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून वैद्यकीय तपासणी केलेली नाही, जप्त करण्यात आलेले दोन बैल/गोवंश हे गोशाळेमध्ये सुरक्षीत ठेवण्यात आलेले आहेत. अर्जदार यांनी बैल/गोवंशाची कोणतीही काळजी घेतलेली नाही त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केलेली आहे.

२१. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी देखील त्यांचे निशाणी क्र. १ वरती लेखी म्हणणे सादर करुन त्यांनी फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३१४/२०२६ मध्ये सादर केलेले म्हणणे प्रस्तुत अर्जास ग्राहय धरण्यात यावे असे कथन करुन सदर अर्जास सक्त हरकत नोंदविलेली आहे. अर्जदार यांनी प्राण्यांचा छळ केलेला आहे, वादातीत गुन्हयाचा तपास चालू आहे इत्यादी कारणांमुळे अर्जदार यांचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केलेली आहे.

२२. त्रयस्थ इसम/गोशाळा यांनी निशाणी क्र. ११ वरती त्यांचे लेखी म्हणणे सादर करुन जप्त करण्यात आलेले बैल/गोवंश अर्जदार यांना परत करु नयेत अशी सक्त हरकत नोंदविलेली आहे. तसेच अर्जदार यांच्याकडून बैल/गोवंश यांच्या पशुपालनाचा प्रतिदिन २००/– रुपये खर्च मिळावा अशी मागणी केलेली

MANIKRAO SATAV
Digitally signed by MANIKRAO SATAV
Date: 2026.06.17 16:58:16 +0530

आहे. तसेच वाहनाच्या मालकाकडून म्हणजेच अर्जदार यांच्याकडून बंदपत्र लिहून घेऊन जप्त करण्यात आलेले बैल/गोवंश यांच्या पालनाचा खर्च मिळण्याबाबत विनंती केली आहे.

**२३. प्रस्तूत प्रकरणातील अर्जदारांचे वकील, सहा. सरकारी अभियोक्ता तसेच गोशाळेचे वकील यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तूत प्रकरणातील दाखल दस्ताऐवजांचे अवलोकन केले. सदर दस्ताऐवज व युक्तीवादावरुन पिंपळनेर पोलीस ठाणे गु.र.नं. ११३/२०२६ मध्ये सदर गुन्हयातील तपासी अधिकारी यांनी एकुण ८ बैल/गोवंश व वाहन क्र.एम.एच.–२३–ए.यु.–८१४१ व एम.एच.–०५–बी.एच.–८९८५ ही वाहने जप्त केल्याबाबत कोणत्याही पक्षाचे दुमत नाही. तसेच सदरचे बैल/गोवंश हे सध्या सुरक्षीततेसाठी त्रयस्थ इसम म्हणजेच गोशाळा यांच्याकडे ठेवले असल्याबाबत देखील कोणत्याही पक्षाचे दुमत नाही.**

**२४. पिंपळनेर पोलीस ठाणे गु.र.नं. ११३/२०२६ हा गुन्हा प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० चे कलम ११अ, महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, १९७६ चे कलम ५बी व ९ अन्वये नोंदविल्याचे दिसून येते.**

**२५.** तपासी अधिकारी यांच्या वतीने अर्जदार यांनी सादर केलेल्या पावत्यांवरती तसेच दस्ताऐवजांवरती हरकत नोंदविलेली आहे. सदर हरकतीमध्ये त्यांनी सदर खरेदी पावत्या नक्की बैल बाजार बुकातील आहेत काय याबाबतची खात्री करावयाची आहे असे कथन केलेले आहे.

२६.  प्रस्तूत प्रकरणातील प्रथम खबरी अहवालाचे अवलोकन केले असता, सकृतदर्शनी असे दिसून येते की, प्रस्तूत प्रकरणातील तपासीक अधिकारी यांनी अशोक लेलॅन्ड कंपनीची गाडी क्र.एम.एच.–२३–ए.यु.–८१४१ व एम.एच.–२३–बी.एच.–८९८५ या मधून गोवंशळ जातीचे बैल वाहतुक करीत असताना व सदर वाहनांमध्ये चारा–पाण्याची व्यवस्था व मोकळी हवा उपलब्ध न करता दाटीवाटीने बांधून वाहतुक करीत असताना जप्त केल्याचे दिसून येते. तसेच सदर गोवंशळ/बैलांच्या वाहतुकीबाबत पशु वैद्यकीय अधिकारी यांचे स्वास्थ्य प्रमाणपत्र नसताना सदर गोवंश/बैलांची वाहतुक करीत असताना मिळून आले होते असे दिसून येते. त्यामुळे सदरचा गुन्हा गणेश लक्ष्मण लांडगे, ईश्वर अंकुशराव आमटे व बलभीम तुकाराम खुर्णे यांच्या विरुध्द नोंदविल्याचे दिसून येते.

२७.  सहा. सरकारी अभियोक्ता व गोशाळेच्या वतीने वाहतुक नियमांचा भंग झाल्याची बाब युक्तीवादाच्या वेळी निदर्शनास आणून दिली. प्रस्तूत प्रकरणातील अर्जदार यांनी पशुधनाच्या वाहतुकीबाबतच्या नियमांचा भंग केल्याचे सकृतदर्शनी दिसून येते.

२८.  केंद्रीय मोटार वाहन नियम १९८९ चे नियम क्र. १२५–ई (२) च्या नियमाप्रमाणे गाई व म्हशी यांच्यासाठी वाहनामध्ये प्रत्येकी २ क्वे.मीटर जागा असणे बंधनकारक आहे. मात्र प्रस्तूत प्रकरणातील दोन्ही वाहनात एकुण ८ बैल/गोवंश यांची वाहतुक केली जात असल्याचे दिसून येते.

MANIKRAO SATAV

Digitally signed by MANIKRAO SATAV
Date: 2026.06.17 16:58:24 +0530

२९.  अर्जदार यांनी प्रस्तूत अर्जामध्ये जप्त पशुधन हे त्यांना मिळाल्यास ते पशुधन कोणासही विक्री करणार नाही अथवा गहान ठेवणार नाहीत असे कथन त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये केलेले आहे. मात्र जप्त पशुधन हे अर्जदार यांना परत केल्यास ते सदर पशुधनाची विक्री करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३०.  गोशाळेच्या वतीने महाराष्ट्र शासनाच्या कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग यांचा दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजीचा शासन निर्णय सादर केलेला आहे. सदर शासन निर्णयातील प्रस्तूत प्रकरणाशी संबंधीत मजकुर खालीलप्रमाणे आहे.

**२.  दिनांक ०१.०६.२०२४ नंतर ईअर टॅगिंगशिवाय पशुधनाची खरेदी–विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. पशुपालकांना पशुधनाची ईअर टॅगिंग व त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीवर असल्याशिवाय खरेदी–विक्री करता येणार नाही.**

**७. पशुधनाची वाहतूक ईअर टॅगिंग असल्याशिवाय करता येणार नाही. तसे केल्यास पशुधनाचे मालक व वाहतूकदार यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.**

**८.  राज्यात विक्रीकरिता येणा–या राज्याबाहेरील प्रत्येक पशुधनास ईअर टॅगिंग केल्याची व त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीवर घेतल्याची खातरजमा तपासणी नाक्यावरील पशुसंवर्धन विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांनी करावी.**

**पशुधनास ईअर टॅगिंग केले नसल्यास तपासणी नाक्यावरील पशुसंवर्धन विभागाच्या अधिकारी/कर्मचारी यांनी या पशुधनास ईअर टॅगिंग करुन त्याची नोंद भारत पशुधन प्रणालीवर घेण्यात यावी. दिनांक ०१.०४.२०२४ नंतर बाहेरच्या राज्यातून महाराष्ट्र राज्यात पशुधनाची वाहतूक ईअर टॅगिंगशिवाय करता येणार नाही.**

**९. दि. ०१.०६.२०२४ पासून ईअर टॅग नसलेल्या पशुधनाची बाजार समित्या, आठवडी बाजार व गावा-गावातील खरेदी-विक्री करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. त्यामुळे ईअर टॅग नसलेले पशुधन बाजार समितीमध्ये आणले जाणार नाहीत व त्यांची खरेदी-विक्री होणार नाही याची दक्षता संबंधित बाजार समितीने घ्यावी.**

**१०. पशुधनाच्या मालकी हस्तांतरणा (Owner Transfer) बाबतच्या नोंदी संबंधित पशुवैद्यकीय अधिका-याकडून त्वरित अद्ययावत करुन घेण्याची जबाबदारी संबंधित पशुपालकाची राहील.**

**११. ग्रामपंचायतीमध्ये पशुंच्या विक्री किंवा परिवर्तनाचा दाखला देतांना पशुधनाची ईअर टॅगिंग झाल्याशिवाय तो देण्यात येवू नये. दाखल्यावर ईअर टॅगचा क्रमांक नमूद करण्यात यावा.**

३१. प्रस्तूत प्रकरणातील जप्त करण्यात आलेल्या बैल/गोवंश यांचे पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडून त्यांची वाहतुक करण्यापूर्वी तपासणी करुन घेतल्याची दिसून येत नाही. तसेच सदर बैल/गोवंश यांचे स्वास्थ्य प्रमाणपत्र देखील त्यांची वाहतुक करताना सोबत बाळगल्याचे दिसून येत नाही. उपरोक्त नमुद शासन

MANIKRAO SATAV Digitally signed by MANIKRAO SATAV Date: 2026.06.17 16:58:33 +0530

निर्णयातील तरतुदींचा भंग देखील बाजार समितीतील संबंधीत कर्मचारी व अर्जदार यांनी केल्याचे दिसून येते. जप्त करण्यात आलेल्या पशुधनाची वाहतुक करताना कोणतीही काळजी अर्जदार यांनी घेतलेली नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत सदर जप्त पशुधनाचा ताबा अर्जदार यांना दिला तर ते सदर पशुधनाचे काळजी व संरक्षण करणार नाहीत. त्यामुळे सदरचे पशुधन गोशाळेकडे काळजी व संरक्षणासाठी देणे योग्य व संयुक्तीक होईल. सबब मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

३२. त्रयस्थ इसम यांनी सादर केलेल्या न्यायनिर्णयांच्या प्रतींवरुन जप्त करण्यात आलेले वाहन परत करते वेळी प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध (खटल्यातील पशु मालमत्तेची देखभाल व परिरक्षण) नियम २०१७ मधील नियम क्र. ४ व ५ प्रमाणे सदर वाहनाच्या मालकाकडून प्रति दिन प्रति पशु २००/– रुपये इतका खर्च आकारता येईल. तसेच त्याबाबत वाहन मालकाडून बॉन्ड देखील लिहून घेण्याबाबत तरतुद असल्याचे दिसून येते. त्रयस्थ इसमाच्या वकीलांनी युक्तीवादाच्या वेळी सदरच्या पशुंच्या देखभालीचा खर्च व बॉन्ड अर्जदार यांनी लिहून दिल्यास सदरचे वाहन अर्जदार यांना परत करण्यास हरकत नाही असे सांगीतले.

३३. अर्जदार लक्ष्मण राधाकिसन दुबाले व बलभीम तुकाराम खुर्णे यांनी दाखल केलेल्या दस्ताऐवजावरुन त्यांची नावे जप्त करण्यात आलेल्या वाहनांच्या मालकी सदरी नमुद असल्याचे नोंदणी प्रमाणपत्रावरुन दिसून येते. तसेच जप्त करण्यात आलेल्या वाहनाची विमा पॉलिसी देखील अस्तीत्वात आहे. अर्जदार हे अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहेत. सदरचे जप्त करण्यात आलेली वाहने

पोलीस ठाण्यात पडून राहिल्यास निश्चितच त्याचे भाग खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे जप्त करण्यात आलेली वाहने अर्जदार लक्ष्मण राधाकिसन दुबाले व बलभीम तुकाराम खुर्णे यांना परत करणे योग्य व संयुक्तीक होईल. त्यामुळे मी मुद्दा क्र. २ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ३ बाबत –**

**३४.** मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविलेला आहे. त्यामुळे अर्जदार हे जप्त करण्यात आलेले ८ बैल/गोवंश (जप्त पशुधन) परत मिळण्यास पात्र नाहीत. मात्र सदरचे पशुधन काळजी व संरक्षण तसेच देखभालीसाठी गोशाळेकडे ठेवणे योग्य व संयुक्तीक होईल. तसेच सदर पशुधनाच्या देखभालीचा प्रतिदिन प्रति पशु २००/– रुपयांप्रमाणे देखभाल खर्च देण्यास अर्जदार हे जबाबदार राहतील. त्याचप्रमाणे गोशाळा देखील पशुधनाच्या सुरक्षीत देखभालीसाठी जबाबदार राहिल.

**३५.** मी मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदविलेला आहे. त्यामुळे अर्जदार लक्ष्मण राधाकिसन दुबाले व बलभीम तुकाराम खुर्णे हे जप्त करण्यात आलेली वाहने परत मिळण्यास पात्र आहेत. मात्र त्याच वेळी अर्जदार यांच्याकडून पशुच्या देखभालीचा प्रतिदिन प्रति पशु २००/– रुपयांप्रमाणे देखभाल खर्च वसुल करणे तसेच भविष्यातील देखभालीच्या खर्चाबाबत जामीन घेऊन सदरची जप्त वाहने अर्जदार यांना खालील अटी व शर्तीवरती परत करणे योग्य व संयुक्तीक होईल. सबब मी मुद्दा क्र. ३ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

MANIKRAO SATAV

Digitally signed by MANIKRAO SATAV
Date: 2026.06.17 16:58:42 +0530

## आ दे श

१. अर्जदार निखील गणेश लांडगे, गणेश लक्ष्मण लांडगे व ईश्वर अंकुशराव आमटे यांनी दाखल केलेले फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३१५/२०२६, ३१६/२०२६ व ३१७/२०२६ हे नामंजुर करण्यात येतात.

२. अर्जदार लक्ष्मण राधाकिसन दुबाले यांनी सादर केलेला फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३१४/२०२६ हा मंजुर करण्यात येतो. तर अर्जदार बलभीम लक्ष्मण खुर्णे यांनी सादर केलेला फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३१८/२०२६ हा अंशत: मंजुर करण्यात येतो.

३. तपासी अधिकारी पिंपळनेर पोलीस स्टेशन गु.र.नं. ११३/२०२६ (प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० चे कलम ११(१) व महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, १९७६ चे कलम ५(बी) व ९) यांना निर्देशित करण्यात येते की, सदर गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेले पशुधन म्हणजेच ८ बैल/गोवंश हे गोशाळेकडे हस्तांतरीत केलेले आहेत. ते पशुधन गोशाळेकडे काळजी व संरक्षणासाठी ठेवण्यात यावेत.

४. तपासी अधिकारी यांनी सदर पशुधनाची शासकीय पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडून दरमहा वैद्यकीय तपासणी करुन घ्यावी. तसेच सदर पशुधनाचे दरमहा फोटो काढून त्यांच्या स्वास्थ्याबाबतचा पशुवैद्यकीय अधिकारी यांनी दिलेला तपासणी अहवाल दरमहा प्रस्तूत प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत न्यायालयात सादर करावा.

५. तपासी अधिकारी पिंपळनेर पोलीस स्टेशन गु.र.नं. ११३/२०२६ (प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० चे कलम ११(१) व महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम, १९७६ चे कलम ५(बी) व ९) यांना निर्देशित करण्यात येते की, सदर गुन्ह्यातील जप्त करण्यात आलेले वाहन नोंदणी क्रमांक एम.एच.–०५–व्ही.एच.–८९८५ हे वाहन अर्जदार लक्ष्मण राधाकिसन दुबाले यांना रक्कम रु.१०,००,०००/– (रुपये दहा लाख फक्त) चे हमीपत्र दिल्यानंतर परत करण्यात यावी. तसेच जप्त वाहन नोंदणी क्रमांक एम.एच.–२३–ए.यु.–८१४१ हे वाहन अर्जदार बलभीम तुकाराम खुर्णे यांना रक्कम रु.१०,००,०००/– (रुपये दहा लाख फक्त) चे हमीपत्र दिल्यानंतर परत करण्यात यावे.

६. अर्जदार लक्ष्मण राधाकिसन दुबाले व बलभीम तुकाराम खुर्णे यांनी जप्त मुद्देमाल ताब्यात मिळाल्यानंतर प्रस्तुत प्रकरणाचा अंतिम निकाल लागेपर्यंत ती वाहने कोणालाही विक्री करु नयेत अथवा सदरच्या वाहनांमध्ये कोणताही बदल करु नये व अशा प्रकारच्या कोणत्याही गुन्ह्यात सदर वाहनाचा वापर करु नये, सदरची वाहने न्यायालयास जेव्हा जेव्हा चौकशीकामी आवश्यकता असेल तेव्हा तेव्हा सदरची वाहने स्वखर्चाने न्यायालयात हजर करावीत.

७. अर्जदार लक्ष्मण राधाकिसन दुबाले व बलभीम तुकाराम खुर्णे यांनी प्राण्यांना क्रुरतेने वागविण्यास प्रतिबंध (खटल्यातील पशु मालमत्तेची देखभाल व परिरक्षण) नियम २०१७ मधील नियम क्र. ४ व ५ प्रमाणे प्रति दिन प्रति पशु २००/– रुपये याप्रमाणे जप्त पशुधनाच्या तारखेपासून ते वाहन सुपुर्त करण्याच्या तारखेपर्यंत सदरची रक्कम पोलीस ठाण्यात जमा करावी व भविष्यातील पशुंच्या देखभालीच्या खर्चाबाबत प्रत्येकी रक्कम रु.१,००,०००/– चा

MANIKRAO SATAV
Digitally signed by MANIKRAO SATAV
Date: 2026.06.17 16:58:50 +0530

बॉन्ड व तेवढयाच रक्कमेचा जामीन तपासी अधिकारी यांच्याकडे सादर करावा.

८. तपासी अधिकारी यांनी सदर वाहन अर्जदार लक्ष्मण राधाकिसन दुबाले व बलभीम तुकाराम खुर्णे यांना परत करण्यापूर्वी सदर वाहनाचे चारही बाजूंनी फोटो काढून त्याबाबत पंचनामा करावा, तसेच आदेशातील नमुद पशुंच्या देखभालीचा खर्च अर्जदारांनी पोलीस ठाण्यात जमा केल्याबाबत खात्री करुन व पशुंच्या भविष्यातील देखभालीच्या खर्चाबाबतचा बॉन्ड व जामीनदार यांची पडताळणी करावी, या सर्व प्रक्रियेचा खर्च प्रस्तुत अर्जदारांनी करावा. वाहन परतीचा पंचनामा, फोटो त्यांचे निगेटीव्हसह तथा योग्य त्या प्रमाणपत्रासह व अर्जदारांनी दिलेल्या हमीपत्र व पशुंच्या भविष्यातील देखभालीचा बॉन्ड व जामीनदार यांनी सादर केलेले दस्ताऐवज इत्यादी सर्व कागदपत्रे प्रस्तुत गुन्ह्याच्या दोषारोपपत्रासह न्यायालयात सादर करावीत.

९. अर्जदार लक्ष्मण राधाकिसन दुबाले व बलभीम तुकाराम खुर्णे यांनी पशुंच्या देखभालीचा खर्च पोलीस ठाण्यात जमा केल्यानंतर सदरची रक्कम ही तपासी अधिकारी यांनी पशुंची वैद्यकीय तपासणी शासकीय पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडून करुन ती खर्चाची रक्कम गोशाळेला हस्तांतरीत करावी.

१०. प्रस्तुत प्रकरणातील सर्व दस्ताऐवज पिंपळनेर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर ११३/२०२६ च्या दोषारोपपत्रासोबत ठेवण्यात यावेत.

११. प्रस्तुतचा आदेश तपासी अधिकारी यांना कळविण्यात यावा.

**१२.** प्रस्तुत आदेशाची डिजीटल स्वाक्षरीची प्रत फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ३१४/२०२६, ३१५/२०२६, ३१६/२०२६, ३१७/२०२६ आणि ३१८/२०२६ मध्ये ठेवण्यात यावी.

MANIKRAO SATAV

Digitally signed by MANIKRAO SATAV
Date: 2026.06.17 16:58:58 +0530

**(माणिकराव रा. सातव)**

**दिनांक – १७/०६/२०२६.** **अति. मुख्य न्यायदंडाधिकारी, बीड.**

CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are word to word as per original judgment/ order.

Dictated on : 17/06/2026

Transcribed on : 17/06/2026

Checked & signed on : 17/06/2026

RAJESH MARUTIRAO NAIK

Digitally signed by RAJESH MARUTIRAO NAIK
Date: 2026.06.17 17:10:47 +0530

(R.M.Naik),
Stenographer Grade-3,
Addl. C.J.M.Court, Beed.

.. ..